N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** सदर बाज़ार

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0621 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/07/2025 22:59

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 28/07/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 28/07/2025
**Time From (वेळेपासून):** 10:11 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:46 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 28/07/2025 **Time (वेळ):** 22:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 031
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/07/2025 22:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** सोलापूर रेल्वे स्टेशनसमोरील,गांधी पुतळ्याजवळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बसवराज राचप्पा बाबानगरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1964

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपो वळसंग, ता दक्षिण,सोलापूर, जि सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपो वळसंग, ता दक्षिण,सोलापूर, जि सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8888356841

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शंकर अरुण बजबळकर | | | 1. 23,नवोदय पार्क, गांधी याच्या घरी,भाडेतत्वावर, होटगी रोड,, सोलापूर,सदर बाज़ार,सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सुरज रविंद्र सर्वगोड | | | 1. आवसे वस्ती, ,अमराई, दमाणी नगर,,सोलापूर,सदर बाज़ार, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | त्यात 500रु दराच्या 18 भारतीय चलनी नोटा. | 9,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

9,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दि.28.07.2025

मी बसवराज राचप्पा बाबानगरे, वय- 61 वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त, सध्या- शेती, रा. मु.पो. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर, मो.नं.8888356841 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,

मी वरील ठिकाणी माझ्या कुटूंबासह राहणेस असून माझे व माझा भाऊ गिरमलप्पा असे आमच्या दोघांच्या नावे मौजे वळसंग, गट नं.128 येथे जवळपास एकूण 7 हेक्टर 52 आर वडिलोपार्जित शेतजमीन आहे. सदर शेतजमीन आमच्या दोन्ही भावांच्या नावे पोटहिस्सा होण्यासाठी मी अर्ज देऊन दि.02/01/2024 रोजी शासकिय शुल्क चलन रुपये 9000/- भरुन अर्ज केला होता, सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.24/02/2025 रोजी भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करण्यात आल्यानंतर पोटहिस्सा होऊन नकाशे मिळाले होते.
त्यानंतर दि.24/07/2025 रोजी मी माझ्या पोटहिश्यात असलेली विहीर व बोरवेल नोंदणी होणेबाबत विनंती अर्ज तयार करुन दि.25/07/2025 रोजी उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर येथे गेलो असता, श्री बजबळकर साहेब, दुरुस्ती लिपीक यांना भेटुन माझे अर्ज दाखविले असता, त्यांनी माझे अर्ज पाहुन सदरचे काम त्यांच्याकडेच असून सदर अर्जामध्ये आकार फोड करण्याचे उल्लेख करण्यास सांगून सदरचे अर्ज आवक जावक येथे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी माझ्या लेखी अर्जामध्ये आकार फोड होण्याचे उल्लेख करून अर्ज आवक जावक येथे जमा केला. त्यानंतर मी बजबळकर साहेबांची भेट घेऊन काम लवकर करून देण्याची विनंती केली असता त्यांनी माझे काम करुन साहेबांची सही घेवुन तहसिल कार्यालयात पाठविण्यासाठी 13000/- रू. द्यावे लागतील असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना 13000/- रू. कशाबाबत दयावे लागतील, सदर रकमेची पावती मिळणार का? याबाबत विचारणा केली असता, त्यांनी पावती नसते परंतु त्यांना पैशे दिल्याशिवाय काम होणार नसल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना पैसे कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी मागणी केलेल्या रकमेत तडजोड करून 10,000/- रू दया असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना माझ्या मुलांशी चर्चा करून येतो असे सांगितले असता त्यांनी मला पैसे घेवुन सोमवारी दि.28/07/2025 रोजी सकाळी येण्यास सांगितले.
मी घरी गेल्यानंतर माझी मुले प्रसाद आणि प्रसन्न यांच्याशी भूमी अभिलेख कार्यालयातील बजबळकर साहेबांनी मागणी केलेल्या रकमेबाबत चर्चा केली. बजबळकर साहेब हे आपल्या कामासाठी लाचेची मागणी करीत असल्याचे लक्षात आल्याने आणि त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी काल दि.27/07/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथील डी.वाय.एस.पी. श्री. चौगुले साहेबांना फोन करून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सांगितली असता, त्यांनी उद्या दि.28/07/2025 रोजी सकाळी 09.00 वाजता लाचलुचपत कार्यालयात येऊन पोनि पिंगुवाले यांना भेटण्यास सांगितले.

आज दि.28/07/2025 रोजी सकाळी 09.00 वाजण्याचे सुमारास मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, सोलापूर येथे येवून पोनि. पिंगुवाले यांची भेट घेवुन माझी तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्या स्टाफकरवी सोलापूर महानगरपालिकेकडून दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व आमची व पंच क्र.01 संजीव मरगप्पा फुले पद- वरिष्ठ श्रेणी लिपिक, विभागीय कार्यालय क्र. 4, सो.म.पा. व पंच क्र.2 विरेंद्र शंकरराव उपरे पद- वरिष्ठ श्रेणी लिपिक, घन कचरा व्यवस्थापन विभाग, सो.म.पा. यांची ओळख करुन दिल्यानंतर मी पंचासमक्ष वळसंग

गावात असलेली गट नं. 128 येथील जवळपास एकूण 7 हेक्टर 52 आर वडिलोपार्जित शेतजमिनीचे मोजणी करून पोटहिस्सा होऊन नकाशे मिळाले होते, त्यापैकी माझ्या पोटहिश्यात विहीर व बोअरवेल नोंद होवुन आकार फोड होवून पुढील कार्यवाहीसाठी तहसिल कार्यालय येथे पाठविण्यासाठी लोकसेवक श्री बजबळकर साहेब, दुरुस्ती लिपीक, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर यांनी माझ्याकडे रु.10000/- लाचेची मागणी करत असल्याबाबतची सविस्तर तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. सोबत मी उप अधीक्षक भूमि अभिलेख, दक्षिण सोलापूर येथे दिलेल्या अर्जाच्या छायांकित प्रती तक्रारी अर्जासोबत जोडून दिल्या. त्यावर मी पण माझी सही केली त्यानंतर पोनि पिंगुवाले, पंच श्री संजीव मरगप्पा फुले व श्री विरेंद्र शंकरराव उपरे यांनी सह्या केल्या.

सदरवेळी पडताळणी कारवाई करण्याच्या अनुषंगाने पोनि. पिंगुवाले यांनी मला श्री बजबळकर, दुरुस्ती लिपीक यांची कोठे भेट होऊ शकते? याबाबत विचारले असता, मी उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर येथे भेट होईल असे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी श्री बजबळकर, दुरुस्ती लिपीक याची पडताळणी करण्याचे ठरवून सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून संजीव मरगप्पा फुले पद- वरिष्ठ श्रेणी लि बसवराज राचप्पा बाबानगरे, वय- 61 वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त, सध्या- शेती, रा. मु.पो. वळसंग, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर, मो.नं.8888356841 पिक, विभागीय कार्यालय क्र. 4, सो.म.पा. व पंच क्र.2 म्हणून विरेंद्र शंकरराव उपरे पद- वरिष्ठ श्रेणी लिपिक, घन कचरा व्यवस्थापन विभाग, सो.म.पा. असे काम करायचे ठरविले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून व्हाईस रेकॉडरचा वापर व उपयोग याबाबत संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड माझेसमक्ष टाकले. त्यानंतर माझे व पंचाचे पडताळणीपुर्व निवेदन व्हाईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी पडताळणीकामी योग्य त्या सूचना देऊन व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझ्या शर्टाच्या आतील बनियनच्या आतमध्ये कोणास दिसणार नाही असे अडकविले. त्यानंतर मला श्री बजबळकर, दुरुस्ती लिपीक यांची भेट घेण्याकरीता पंच क्र.1 फुले यांच्यासह माझी होन्डा कंपनीची लाल रंगाची शाईन मोटार सायकल क्र. एमएच 13 डीडी 6606 यावरुन 10.16 वाजता रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे भूमी अभिलेख कार्यालयात गेलो असता, कार्यालयात श्री बजबळकर साहेब दिसले नाही त्यामुळे मी माझ्या वरील मोबाईल क्रमांकावरून त्यांचे मोबाईल क्र. 8788428544 वर कॉल करुन कार्यालयात आलेबाबत सांगितले असता, त्यांनी मला होटगी रोडवरील संचार प्रेसजवळ येण्यास सांगितले, त्यांनतर मी व पंच क्र.1 फुले असे दोघे माझे मोटार सायकलवरुन होटगी रोडवरील संचार प्रेस येथे जावून श्री बजबळकर साहेबांची वाट बघत थांबलो. श्री बजबळकर साहेब न दिसल्याने मी पुन्हा त्यांना कॉल केला असता त्यांनी येत असल्याचे सांगितले. थोडयावेळाने श्री बजबळकर साहेब अॅटो रिक्षा क्र. एमएच 13 सीटी 8029 मधून आमच्या जवळ आले, त्यावेळी त्यांनी त्यांच्या सॅकमधून माझ्या कामासंदर्भातील कागदपत्रे काढून दाखवले व कामाबाबत चर्चा केली, त्यावेळी चर्चे दरम्यान मी त्यांना मी काय म्हणतो आपल्या पैश्याच कस करायच. तुम्ही 10000 मागितलाव ते जास्त वाटाय लागलाय मला. पण काय कमी करता येतय का बार्गेनिंग प्लीझ असे सांगितले असता, त्यांनी इथ काय आपल.. तसल काय आपण.. आपल स्वभाव तुम्हाला माहित हाय का नाही. आत गेल की काम व्हायला पाहिजे. तस काय नाही. फक्त...नाहीतर एक काम करा. साहेबाच्या सहीला तुम्ही या असे बोलून साहेबांची सही घ्यावी लागते असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाही तुम्ही त्यादिवशी 13000 बोलले.. जास्त झाल बोललो ना असे सांगितले असता, त्यावेळी बजबळकर यांनी नाही नाही नाही जास्त नाही असे बोलून 13000 रुपये जास्त नसल्याचे सांगितले. त्यावर मी त्यांना मग 10000 बोलले ना शेवटी, त्यात थोड कमी होतय का बघा. आम्हाला साहेबाकड जायच वेळ आणू नका. असे सांगितले. त्यावेळी त्यांनी नाही ते काय हे साहेबाच हे आहे ते. आपण काय करणार ना. असे सांगितले. त्यानंतर चर्चेदरम्यान त्यांनी घ्या त्यांच फोन नंबर घ्या असे बोलून रिक्षा चालक यांचा फोन नंबर घेण्यास सांगितले. त्यावेळी मी रिक्षाचालकास त्यांचे नांव विचारले असता, त्यांनी सर्वगोड असे सांगितले आणि त्यांनी त्यांचा माबाईल नंबर 9767840584 असा असल्याचे सांगितले. तो मोबाईल नंबर मी सेव्ह करुन घेतला. त्यानंतर आमच्या कामाबाबत चर्चा चालू असताना मी बजबळकर साहेबांना ते तुम्ही सांगा. त्यांची माझी ओळख नाही. उद्या मी त्यांच्याकड पैसे दिलो प्रॉब्लम नको व्हायला. असे बोलून लाच रक्कम रिक्षाचालक सर्वगोड यांच्याकडे दिले तर काही अडचण नाही ना असे विचारले असता, त्यांनी नाही नाही असे सांगितले. त्यावेळी बजबळकर साहेबांनी रिक्षा चालक सर्वगोड यांना ऑफिसला बघू नंतर. पैसे तुमच्याकड देऊन टाकतेत तुम्ही घेऊन ठेवा असे बोलले. याप्रमाणे रिक्षाचालक सर्वगोड यांच्याकडे लाचेची रक्कम देण्याचे ठरल्यानंतर मी माझ्या मुलाकडून पैसे घेऊन येतो असे सांगुन तिथून निघालो. मी व पंच क्र. 1 असे दोघे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयास येत असताना थोडयावेळाने माझ्या मोबाईलवर बजबळकर यांचा फोन आला, परंतू मी गाडीवर असल्याने त्यांचा फोन घेतला नाही. मी रस्त्याच्या कडेला गाडी थांबवून त्यांना पुन्हा फोन केला असता त्यांनी मला कुठे आहे असे विचारणा केली, तेव्हा मी त्यांना मी आता ते सातरस्ताच पेट्रोलपंप हाय ना. हा

या. वाटेतच उभारलो बघा. असे सांगितले असता त्यांनी मला थांबण्यास सांगितले. त्यानंतर थोडयावेळाने सर्वगोड यांच्या रिक्षामधून बजबळकर हे सातरस्ता पेट्रोलपंपाजवळ आम्ही थांबलेल्या ठिकाणी आले व आमची भेट घेतली, त्यावेळी चर्चेदम्यान मी त्यांना हा. तुम्ही बोललेल आकडा देतो. माझ काम होण्याशी मतलब असे सांगितले असता, त्यांनी काम शंभर टक्के होणार. असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना मुलगा आलाना तुम्हाला तुमच 10000/- रू देऊन टाकतो. तुम्ही हांच्याकड द्या म्हणल तर हांच्याकड देतो. माझ काय प्रॉब्लेम नाही. असे सांगितले. त्यावेळी त्यांनी एक काम करा हांच्याकड द्या असे बोलून लाच रक्कम रिक्षा चालक सर्वगोड याच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर त्यांनी हो तुमच काम शंभरटक्के होणार त्यात काय वाद नाही. असे बोलून माझे काम करण्याची हमी दिली. त्यानंतर मी त्यांना मी हांच्याकड देताना तुम्हाला फोन करतो. दहा हजार मध्ये हजार कमी होतेत का बघा ना. 9000 देऊ का? 9000 देऊ? तुम्ही सांगा. सांगा तुम्ही असे बोलून लाच रक्कम कमी करुन 9000/- रुपये करण्याबाबत तडजोड केली असता, त्यांनी ओ.के ओ.के असे बोलून रु. 9000/- घेण्याची तयारी दर्शवीली. त्यावेळी पंच क्र. 1 श्री संजीव फुले हे माझे सोबतच होते व त्यांनी संपुर्ण मागणीचे संभाषण ऐकले आहे. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री संजीव फुले असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात 11.29 वा परत येवून वरील हकिकत सांगितली. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईसरेकॉर्डरमध्ये झालेले संभाषण ऐकले असता, वरीलप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले.

सदर पडताळणी कारवाईदरम्यान श्री बजबळकर यांनी माझ्याकडे तडजोडीअंती 9,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम अॅटो रिक्षा क्र. एमएच 13 सीटी 8029 चे चालक सर्वगोड यांना देण्यास सांगितल्याने व सदरची रक्कम रिक्षा चालक सर्वगोड यांनी स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने पोनि. पिंगुवाले यांनी सर्वगोड यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देऊन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती देऊन त्याचा वापर व उपयोग सांगुन प्रात्यक्षिक दाखविले. सदर वेळी मी हजर केलेले 9,000/- रू. रक्कमेच्या नोटांचे क्रमांक एका कागदावर लिहुन घेतल्यानंतर सहा.पोलीस उपनिरीक्षक कोळी यांच्या हस्ते नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टाच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी सहा. पोलीस उपनिरीक्षक कोळी यांना सापळा कारवाईत भाग न घेता कार्यालयातच थांबून राहण्यास सांगितले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी माझे व पंचाचे सापळापुर्व निवेदन व्हाईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेतले. त्यानंतर मला सर्वगोड यांची कोठे भेट होऊ शकते? याबाबत विचारणा करण्याचे सांगितले. त्यावेळी मी सर्वगोड यांना माझ्या मोबाईलवरुन त्यांचे 9767840584 यावर 13.13 वा वाजता फोन करून स्पीकर चालू ठेऊन कुठे आहे असे विचारले असता त्यांनी मी स्टेशनला हाय.. असे सांगून सोलापूर रेल्वे स्टेशजवळ येण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना नेमके कुठे भेट होईल याबाबत विचारले असता, त्यांनी गांधी पुतळ्यापाशी थांबतो या.. असे सांगितले. सदरचे संंभाषण व्हाईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर पोनि. पिंगुवाले यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार पोना संतोष नरोटे, पोकॉ राजु पवार, पोकॉ गजानन किणगी त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या तसेच सापळा कारवाईनंतर सर्वगोड यांच्या अंगझडतीचे मोबाईलवर चित्रीकरण करण्याबाबत पोलीस अंमलदार संतोष नरोटे यांना सुचना दिल्या. सदरवेळी बजबळकर हे भूमि अभिलेख कार्यालयामध्ये असण्याची शक्यता असल्याने त्यांना ताब्यात घेण्याकरीता पोलीस उपअधीक्षक श्री चौगुले साहेब व पोलीस अंमलदार किणगी असे दोघे भूमी अभिलेख कार्यालयात जाऊन बजबळकर यांच्यावर सापळा लावून थांबण्याचे ठरले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हाईस रेकॉर्डर चालू करुन ते माझ्या शर्टाच्या आतील बाजूस बनियानच्या आत गळयात अडकवून मला व पंच क्र.1 असे दोघांना माझ्याकडील दुचाकीवरुन 13.12 वाजता रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले हे पंच क्र.2 व सापळा पथकासह शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून शासकिय वाहन डीआरएम ऑफिस, सोलापूर जवळ थांबूवन रेल्वे स्टेशन जवळील गांधी चौक येथील सोलापूर फॅब्रिक्स या दुकानाच्या जवळ कोणास संशय येणार नाही याप्रमाणे सापळा लावून थांबले.

मी व पंच क्र.1 असे दोघे गांधी चौकाजवळ सोलापूर फॅब्रिक्स दुकानाच्या समोर आलो असता, रोडवर रिक्षाच्या बाहेर थांबून रिक्षा चालक सर्वगोड यांनी मला पाहुन ओळखून हाताच्या इशा-याने थांबण्यास सांगितले त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे गाडी उभी करून थांबलो असता रिक्षा चालक सर्वगोड यांनी दया असे बोलून लोकसेवक यांनी सांगितल्याप्रमाणे नऊ हजार रुपये लाचेची मागणी केली, त्यावेळी मी माझ्या शर्टाच्या समोरील डाव्या खिशात ठेवलेली लाच रक्कम माझे उजव्या हाताने काढून दिली असता सर्वगोड यांनी लाच रक्कम त्यंाच्या उजव्या हाताने स्विकारुन त्यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या खिशात ठेवली. त्यावेळी मी त्यांना बोला त्यांना फोन लावून..मोजून घ्या मोजून घ्या..मोजा..मोजा ओ.. असे सांगितले असता, त्यांनी नाय बरोबर असतील की.. असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना पुन्हा मोजून घ्या असे सांगितले असता, त्यांनी पावडर कसली ओ ही.. असे बोलून लाच रक्कम स्विकारुन

मोजताना त्यांना अॅन्थ्रासीन पावडर हाताला लागल्यानंतर विचारणा केली. त्यावेळी मी त्यांना ते ऑफीसमध्ये, फोन लावा ना साहेबांना..मिळाले.. पैसे दिले म्हणुन.. असे सांगितले असता, त्यांनी लावा तुम्हीच असे सांगितले, त्यावेळी मी बजबळकर यांना फोन लावला. सदरवेळी सर्वगोड यांना पावडरचा स्पर्श जाणवल्याने त्यांना संशय आल्याने त्यांनी ह्रोका पैसे साहेबांना द्या तुम्ही.. साहेबांना द्या तुम्ही.. साहेबांना द्या तुम्ही असे बोलून सदरची रक्कम तुम्हीच साहेबांना द्या असे सांगत होते. त्यावेळी मी ठरल्याप्रमाणे माझा रुमाल काढून खांदयावर टाकून इशारा दिला असता, जवळच सापळा लावून थांबलेले पोनि पिंगुवाले व सापळा पथकातील अंमलदार यांनी सर्वगोड यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हाईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला, ती वेळ 13.46 वा.ची होती. सदरवेळी पोना संतोष नरोटे यांनी सर्वगोड यांच्या अंगझडतीचे मोबाईलवर चित्रीकरणास केले. सर्वगोड यांना ताब्यात घेतल्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांना नाव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सुरज रविंद्र सर्वगोड, वय 35 वर्षे, रिक्षा चालक, रा. आवसे वस्ती, अमराई, दमाणी नगर, सोलापूर असे असल्याचे सांगितले. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी सर्वगोड यांना तक्रारदार यांच्याकडून स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली आहे याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या खिशात ठेवले असल्याचे सांगितले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांच्या सुचनेवरून सर्वगोड यांनी त्यांच्या शर्टाच्या खिशातील रक्कम काढून पंच क्र.2 विरेंद्र उपरे यांच्याकडे दिली. सदर रक्कम पोनि पिंगुवाले यांच्या सूचनेवरुन पंच क्र.2 यांनी तपासून पाहिली असता, को-या कागदावर नंबर लिहून घेतलेल्या व अॅन्थ्रासीन पावडर लावून ठेवलेल्या नोटा असल्याचे दिसून आले. त्यानंतर सर्वगोड यांचे रिक्षामध्ये त्यांचे हात व शर्टाच्या खिशाची तसेच त्यांच्या ताब्यातून मिळुन आलेल्या नोटांचे अल्ट्रा व्हॉयोलेट दिव्याच्या प्रकाशात दोन्ही पंचांच्या समक्ष तपासणी केली असता, सदरठिकाणी अॅन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली. त्यानंतर झालेल्या सापळा कारवाईबाबत डीवायएसपी चौगुले साहेब यांना माहिती दिली असता, त्यांनी लोकसेवक श्री बजबळकर दुरुस्ती लिपीक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर यांना ताब्यात घेवून त्यांचे नांव पत्ता विचारले असता, त्यानी त्यांचे नांव श्री शंकर अरुण बजबळकर, वय 30 वर्षे, पद- दुरुस्ती लिपीक, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर, रा. फ्लॅट नं. 23, नवोदय पार्क, गांधी यांच्या घरी भाडेतत्वावर, होटगी रोड, सोलापूर असे सांगितले. त्यानंतर सदर यशस्वी सापळा कारवाईबाबत श्री कांबळे, उपअधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर यांना माहिती देवून आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात आलो. त्यानंतर पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय सोलापूर येथे पुर्ण करण्यात आले.

तरी आज दि.28/07/2025 रोजी 10.11 ते 13.46 वा चे दरम्यान लोकसेवक श्री शंकर अरुण बजबळकर, वय 30 वर्षे, पद- दुरुस्ती लिपीक, उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर, रा. फ्लॅट नं. 23, नवोदय पार्क, गांधी यांच्या घरी भाडेतत्वावर, होटगी रोड, सोलापूर यांनी माझे वळसंग गावातील गट नं.128 ची वडिलोपार्जित जवळपास एकूण 7 हेक्टर 52 आर शेतजमीनीचे माझे भाऊ व माझ्यात पोटहिश्याची मोजणी केली होती, त्यानंतर माझ्या हिश्यात विहीर व बोअरवेल नोंद होवुन आकार फोड होवून पुढील कार्यवाहीसाठी तहसिल कार्यालय येथे पाठविण्यासाठी दिलेल्या अर्जाच्या अनुषंगाने आकार फोड करून तहसिल कार्यालयाकडे पाठविण्यासाठी स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन माझ्याकडे रु.10,000/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.9000/- लाचेची मागणी करून रुपये 9,000/- लाच रक्कम खाजगी इसम रिक्षा चालक श्री सुरज रविंद्र सर्वगोड, वय 35 वर्षे, रिक्षा चालक, रा. आवसे वस्ती, अमराई, दमाणी नगर, सोलापूर यांच्याकडे मार्फतीने सोलापूर रेल्वे स्टेशनसमोरील गांधी पुतळ्याजवळ स्विकारले. अशा प्रकारे आरोपी लोकसेवक श्री शंकर अरुण बजबळकर, वय 30 वर्षे, पद- दुरुस्ती लिपीक, उप अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, दक्षिण सोलापूर, यांनी सार्वजनिक कर्तव्य करण्यासाठी कायदेशीर परिश्रमाखेरीज लाचेची मागणी करुन आरोपी क्र 2) खाजगी इसम रिक्षा चालक श्री सुरज रविंद्र सर्वगोड यांच्याद्वारे गैरफायदा प्राप्त करून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपलेकडील लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची प्रिंट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

समक्ष

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

namdev vitthal bandgar(I (Inspector)) / pi **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

29/07/2025

पोलीस ठाणे अंमलदार
सदर बझार पोलीस स्टेशन
सोलापूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): namdev vitthal ban
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pi

पोलीस निरिक्षक सदर बझार पोलीस स्टेशन सोलापूर शहर
सत्यमेव जयते